# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : ७/१२/२०१८

**आलोसे विजय जयसिंग पाचुपते, अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग–२, नेमणुक अन्न व औषध प्रशासन, बांद्रा (पुर्व) यांना १५,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांचा पिंपळगांव(ब)येथील वणी–पाचोरे फाटा येथे हॉटेल व्यवसाय असून सदर हॉटेलच्या परवाना निलंबनाबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून तक्रारदार यांना नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीवर तक्रारदार यांनी दिलेल्या उत्तरावर सकारात्मक अहवाल संबंधित कार्यालयास पाठविण्यासाठी आलोसे विजय जयसिंग पाचुपते, अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग–२, नेमणुक अन्न व औषध प्रशासन, बांद्रा (पुर्व) यांनी दि. ७/१२/२०१८ रोजी तक्रारदार यांना २०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक ७/१२/२०१८ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे विजय जयसिंग पाचुपते, अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग–२, नेमणुक अन्न व औषध प्रशासन, बांद्रा (पुर्व) यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/–रुपये लाचेची मागणी केली व तडजोडी अंती १५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम नाशिक महामार्ग बस स्टॅण्डचे आवारात स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल कमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅण्डलाईन ते लॅण्डलाईन व मोबाईल ते लॅण्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर कमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी कमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१–२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२–२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४–२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७–२२३५४७७ | **१०६४** |

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
सत्यमेव जयते

(स्वाक्षरी)

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता